**आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र,**
**नागपूर फोन नं : 0712-2551550/2551541 ई मेल-**commissionermgnregsmah@gmail.com

पत्र क्रं. आयुक्तालय/पंचायत/ २०१ /2016 दिनांकः २३ /2/2016

प्रति,

जिल्हाधिकारी (सर्व)

मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व)

विषय : मगांराग्रारोहयो हेल्पलाईनचे नवीन क्रमांक सर्व स्तरावर कळविण्याबाबत

संदर्भ : दिनांक .1/1/2016 रोजी पुर्ण झालेली हेल्पलाईन संदर्भातील ई-टेंडरींग प्रक्रिया

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने या आधी हेल्पलाईनचे काम हाताळणारी संस्थेसोबतचा करार संपुष्टात आलेला आहे. त्यामुळे आयुक्तालयस्तरावरून पुन:श्च ई-टेंडरींगची प्रक्रिया पुर्ण करण्यात आलेली असून मे. टोटल मोबीलीटी टेक सव्हिसेस प्रा.लि. या कंपनीला हेल्पलाईनचे काम देण्यात आले आहे. सदर प्रक्रियेमुळे जुन्या संस्थेने दिलेला Toll Free क्रमांक (18002676001) बंद झालेला असून मे. टोटल मोबीलीटी टेक सव्हिसेस प्रा.लि.ने 1800-22-3839 हा Toll Free क्रमांक हेल्पलाईनसाठी प्राप्त केलेला आहे.

सदर हेल्पलाईन क्रमांक 1800-22-3839 दिनांक 1/3/2016 पासून कार्यरत करण्यात येणार असून या आधी हेल्पलाईनच्या माध्यमाने करण्यात येणारी सर्व कामे नवीन नंबर वापरून करणे अपेक्षित आहे. आपणांस विनंती आहे की, नवीन टोल फ्री क्रमांक वापरुन ग्रामस्थांना हेल्पलाईनची सुविधा देण्यास्तव आपले स्तरावरुन पुढील कार्यवाही करावी.

1) जुने Toll Free क्रमांक (18002676001) बद झाल्याबाबतच्या सूचना सर्व स्तरावर म्हणजेच जिल्हास्तर, तालुकास्तर, ग्रामपंचायतस्तरावर व कार्यान्वयीन यंत्रणा यांना निर्गमित कराव्यात.
2) जुना टोल फ्री क्रमांका ऐवजी नवीन टोल फ्री क्रमांक वापरुन हेल्पलाईन अस्तित्वात असल्याबाबत तसेच नवीन टोल फ्री क्रमांक (1800-22-3839) सर्व स्तरावर म्हणजेच जिल्हास्तर, तालुकास्तर, ग्रामपंचायतस्तरावर व कार्यान्वयीन यांना कळवावे.
   या आधी केलेल्या कार्यवाहीप्रमाणे नवीन Toll Free क्रमांक, "**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र-हेल्पलाईन क्र 1800-22-3839**" असे सर्व ग्रामपंचायतीमध्ये दर्शनीय भागावर मोठया अक्षरात पेंट करण्याबाबतच्या सूचना निर्गमित कराव्यात.
3) सर्व ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेमध्ये हेल्पलाईन क्रमांकामध्ये झालेल्या बदलाबाबत माहिती देवून नवीन हेल्पलाईन क्रमांकाची माहिती द्यावी. तसेच सदर हेल्पलाईन क्रमांकावर कामाची मागणी नोंदविणे, मगांराग्रारोहयोची माहिती घेणे व तक्रार नोंदविणे इ. बाबींचा समावेश आहे. ही बाब देखील निदर्शनास आणून देण्यास्तव कार्यवाही करावी.